महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-३(अ)/संप/२०२३/५७६२ दिनांक :१३/१२/२०२३

**परिपत्रक**

**विषय- दिनांक १४/१२/२०२३ पासून बेमुदत संपाबाबत.**

संदर्भ : १) तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक १२/आस्था(२)/संप/२०२३/९५८ दि. १३/१२/२०२३.

२)तंत्र शिक्षण विभाग कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र यांचे पत्र क्र.No/TEECAM/2023/53, दिनांक १३/१२/२०२३.

उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकाच्या अनुषंगाने, जुनी पेन्शन योजना मिळणेबाबत व इतरही सर्व महत्वाच्या मागण्या मिळविण्यासाठी सर्व तृतीय व चतुर्थश्रेणी शासकीय कर्मचारी दिनांक १४/१२/२०२३ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने सर्व संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी संप कालावधीमध्ये आपल्या संस्थेतील/कार्यालयातील उपस्थित असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात तयार करून दिनांक १४/१२/२०२३ पासून दररोज सकाळी १०:३० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या **est.ropune@gmail.com** ई-मेलवर सादर करावी. जेणेकरुन सदर माहिती एकत्र करुन तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करणे शक्य होईल. वेळेवर माहिती प्राप्त होईल याची सर्वस्वी जबाबदारी ही संस्थाप्रमुख/कार्यालयप्रमुख यांची राहील यांची नोंद घ्यावी.

सर्व कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, दिनांक १४ डिसेंबर २०२३ पासून बेमुदत संपात सहभागी न होता कर्तव्यावर उपस्थित रहावे. अन्यथा शासकीय कर्मचाऱ्यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येवून अशा कर्मचाऱ्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच संपाच्या काळात कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही व संपात सहभागी झाल्यास "काम नाही वेतन नाही" या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल. याची नोंद घ्यावी.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत-वरीलप्रमाणे

प्रत - सर्व संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

१) प्राचार्य / उपसचिव,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय संस्था /कार्यालय.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.

प्रपत्र - ब

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

विभागीय कार्यालय तसेच त्यांचे अधिपत्याखालील सर्व शासकीय / कार्यालयतील अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबतची माहिती

नाव -

पुणे विभाग

दिनांक १४ डिसेंबर २०२३

| संवर्ग | एकुण अधिकारी/ कर्मच-यांची (संख्या) | पूर्व परवानगीने रजेवर असलेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | संपात सहभागी झालेले अधिकारी/कर्मचारी (संख्या) | कार्यालयात उपस्थित असलेल्या अधिकारी /कर्मचा-यांची (संख्या) |
|---|---|---|---|---|
| गट अ | | | | |
| गट ब | | | | |
| गट क | | | | |
| गट ड | | | | |
| एकूण | | | | |

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४७८/४१२/४६३,
ई-मेल-desk12@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तिरंग्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक : क्रमांक १२/आस्था(२)/संप/२०२३/९५८ दिनांक 13 DEC 2023

संदर्भ : १) असो. ऑफ क्लास थ्री मिनिस्ट्रीयल एम्प्लॉइज ऑफ दि डिपार्टमेंट ऑफ टेक्नीकल एज्युकेशन इन ग्रेटर मुंबई यांचे पत्र दिनांक ११.१२.२०२३
२) तंत्रशिक्षण विभाग कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्र यांचे निवेदन दिनांक १३.१२.२०२३

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेने "जुनी पेन्शन योजना मिळणेबाबत व इतरही सर्व महत्वाच्या मागण्या मिळविण्यासाठी" राज्यभर सर्व शासकीय कर्मचारी दिनांक १४ डिसेंबर, २०२३ पासून बेमुदत संपावर जाणार असल्याचे संदर्भीय पत्र/निवेदनाव्दारे या संचालनालयास कळविले आहे.

संपकाळात शासनाकडून वेळोवेळी सूचना निर्गमित केल्या जातात. त्यामध्ये शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येईल व अशा कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत केंद्र शासनाचे काम नाही वेतन नाही हे धोरण राज्य शासनही अनुसरत आहे, अशी तरतूद आहे.

यास अनुसरून तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत सर्व राज्य सरकारी तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधीत तृतीय / चतुर्थ कर्मचाऱ्यांनी दिनांक १४ डिसेंबर, २०२३ पासून बेमुदत संपात सहभागी न होता कर्तव्यावर उपस्थित राहावे. अन्यथा शासकीय कर्मचाऱ्यांनी संपात भाग घेणे गैरवर्तणूक बाब समजण्यात येवून अशा कर्मचाऱ्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच उपरोक्त कार्यकाळात कोणत्याही कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रकारची रजा मंजूर केली जाणार नाही व संपात सहभागी झाल्यास "काम नाही वेतन नाही" या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल, याची नोंद घ्यावी.

( डॉ. सुनिल भामरे )
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- आवश्यक त्या माहिती व कार्यवाहीसाठी

१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर
२) सचिव, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३) सरचिटणीस, असो. ऑफ क्लास थ्री मिनिस्ट्रीयल एम्प्लॉइल ऑफ दि डिपार्टमेंट ऑफ टेक्नीकल एज्युकेशन इन ग्रेटर बॉम्बे, मुंबई, नोदंणी क्रमांक - जीएडी आरजीए -१०६८-जे, दि.१३.०७.१९६८
४) तंत्र शिक्षण विभाग कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र, मुख्य कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन, छत्रपती संभाजीनगर.
५) कार्यासन अधिकारी, सर्व कार्यासने, मुख्य कार्यालय, मुंबई त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हे परिपत्रक त्यांच्या कार्यासनातील सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे. तसेच संपात सहभागी होण्यापासून परावृत्त करावे. सदर परिपत्रक त्यांचे निर्दशनास आणलेबाबत त्यांची स्वाक्षरी घ्यावी. तसेच संपकाळात मुख्यालय सोडून जावू नये व कार्यासनातील कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये.
६) कार्यासन क्रमांक १२ निवडनस्ती

D:\after 13.09.2022\Manasi\strike.doc